दै० नवराष्ट्र दि० ०८/०१/२०२६

## भिवंडी महापालिकेतर्फे मतदानाची शपथ घेऊन पथनाट्य केले सादर

# भिवंडीत मतदान जनजागृती




भिवंडी (वा.) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत आयुक्त अनमोल सागर व अतिरीक्त आयुक्त नयना ससाणे व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील नागरीकांना मतदानाचे महत्व पटवुन देण्याकरीता पदमश्री अण्णासाहेब जाधव हायस्कुल धामणकर नाका याठिकाणी शिक्षक व महिला पालकवर्ग यांचेसोबत मतदानाची शपथ घेऊन पथनाटय सादर करुन महिला पालकवर्गामध्ये मतदान जनजागृती करण्यात आली. याकामी सहाय्क नोडल अधिकारी कल्पना तळपाडे व राहुल नाडेकर तसेच सुधिर घागस (प्राचार्य) अरुणा जाधव (उपाध्यक्ष) तसेच पथकातील कर्मचारी पंडीत केणे, सुबोध जाधव, धनश्री मेस्त्री व लिना तारे, पंकजकुमार राऊत, सनी ओव्हाळ, विकी जाधव याप्रसंगी यांनी उपस्थीत राहुन सक्रीय सहभाग घेण्यात आला.

दै० लोकमत दि० ०८/०१/२०२६

## पालिका शाळांत कार्यक्रम

महापालिकेच्या विविध शाळांत आकर्षक रंग भरून रांगोळी काढून त्याभोवती फुलांची सजावट करून तसेच हातांवर रेखाटलेल्या मेंदीच्या माध्यमातून अनोख्या पद्धतीने मतदानाची जनजागृती करण्यात आली.

Scanned with OKEN Scanner

हि० (मुंबई इन्कलाब दि० 04/09/2024

# بھیونڈی: میدان میں واحد امیدوار کے باوجود ووٹنگ کرانے کا مطالبہ زور پکڑنے لگا

**بھیونڈی**، (خالد عبدالقیوم انصاری): میونسپل کارپوریشن کے انتخابات میں نامزدگیاں واپس لئے جانے کے بعد شہر کے ۶ وارڈوں میں صرف ایک ایک امیدوار باقی رہنے پر شہری حلقوں میں تشویش پائی جارہی ہے۔ اس معاملے پر سوال اٹھاتے ہوئے سماجی کارکنان اور شہریوں نے مطالبہ کیا ہے کہ بلامقابلہ انتخاب کے بجائے ووٹنگ کرائی جائے تاکہ ووٹروں کو اپنے حقِ رائے دہی کے استعمال کا پورا موقع مل سکے۔

سماجی کارکن فاروق پٹھان نے اس سلسلے میں متعلقہ انتخابی افسر کو تحریری درخواست پیش کی ہے جس میں واضح کیا گیا ہے کہ نامزدگیاں واپس لینے کے بعد صرف ایک امیدوار کا باقی رہ جانا ووٹنگ منسوخ کرنے کی معقول وجہ نہیں ہوسکتا۔ انہوں نے نشاندہی کی کہ ۲۰۱۳ء میں عدالتِ عظمیٰ کے فیصلے کے تحت ووٹروں کو 'نوٹا' کا قانونی حق دیا گیا ہے، جس کا مقصد عوام کو امیدواروں کو مسترد کرنے کا اختیار فراہم کرنا ہے۔ فاروق پٹھان کے مطابق اگر واحد امیدوار کو بلامقابلہ منتخب قرار دے دیا جاتا ہے تو ووٹروں کو 'نوٹا' کے ذریعے اپنی ناپسندیدگی ظاہر کرنے کے بنیادی حق سے محروم کردیا جاتا ہے، جو جمہوری اقدار اور انتخابی شفافیت کے خلاف ہے۔ ان کا کہنا ہے کہ ووٹ ڈالنے کا حق جمہوریت کی اساس ہے اور کسی بھی مرحلے پر عوام کو اس حق سے محروم نہیں کیا جانا چاہئے۔ انہوں نے مطالبہ کیا ہے کہ جن وارڈوں میں صرف ایک امیدوار باقی رہ گیا ہے، وہاں بلامقابلہ انتخاب کا اعلان کرنے کے بجائے ووٹنگ کا انعقاد کیا جائے تاکہ ووٹر واحد امیدوار یا 'نوٹا' میں سے کسی ایک کا انتخاب کرسکیں۔ ساتھ ہی انتخابی حکام سے اپیل کی گئی ہے کہ وہ اس معاملے پر سنجیدگی سے غور کرتے ہوئے جمہوری روح کے مطابق فیصلہ کریں۔

Scanned with OKEN Scanner

दै० लोकमत दि० ०८/०१/२०२६

# आचारसंहितेमुळे ठाण्यातून ३० आरोपींना केले तडीपार

## ठाणे, उल्हासनगरमधील सराईत गुंडांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने हाणामारी करणारे, टोळीने गुन्हे करणारे तसेच गंभीर गुन्ह्यात शिक्षा भोगून आलेल्या ३० गुन्हेगारांना आचारसंहिता लागू झाल्यापासून गेल्या १५ दिवसांत तडीपार केल्याची माहिती ठाणे पोलिसांनी दिली. ठाण्यातून सर्वाधिक १४ आरोपींवर तडीपार करून प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

महापालिका निवडणुकीत कोणत्याही समाजकंटकांकडून अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी १५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत ठाणे शहर पोलिस आयुक्तालयातील ३५ पोलिस ठाण्यांतर्गत कुख्यात गुंडांची माहिती गोळा करण्यात आली. यामध्ये ठाणे महापालिका क्षेत्रात टोळीने हाणामारी करणाऱ्या एकावर तर भिवंडी-निजामपुरा भागातील दोघांवर आणि कल्याण-डोंबिवलीतून एकावर अशा चौघांविरुद्ध महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५५ अंतर्गत तडीपारीची कारवाई केली. एकट्याने येत हल्ला करणाऱ्यांपैकी ठाण्यातून १३, भिवंडीतून दोन, कल्याणमधून एक तर उल्हासनगरमधून १० अशा २६ जणांविरुद्ध कारवाई झाली.

**१५ दिवसांत ३० गुन्हेगारांना तडीपार केले.**

विविध प्रकारच्या गुन्ह्यांत शिक्षा होऊन सुटलेल्या गुन्हेगारांकडून पुन्हा एखादा गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडू नये, यासाठी कलम ५७ नुसार ठाणे शहर आणि भिवंडीतून प्रत्येकी एक अशा दोघांना तडीपार करण्यात आले आहे.

निवडणुकीत कोणत्याही प्रकारचे गुन्हे करू शकणाऱ्यांवरही स्थानिक पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथक, गुन्हे अन्वेषण विभागाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

हिन्दी सा. खबर-दर-खबर दि० 07/01/2026 से 13/01/2026

# भाजपा-कांग्रेस कार्यकर्ताओं में हिंसक झड़प

## पथराव और लाठीचार्ज के बाद 23 पर मामला दर्ज

■ केडीके न्यूज नेटवर्क





भिवंडी मनपा चुनाव के प्रचार के दौरान भिवंडी का राजनीतिक माहौल उस समय गरमा गया, जब प्रभाग क्रमांक 20 के भंडारी चौक (नारपोली) इलाके में भाजपा और कांग्रेस समर्थक आपस में भिड़ गए। 3 जनवरी शनिवार शाम करीब साढ़े 7 बजे हुई इस हिंसक झड़प में जमकर लाठियां चलीं और पत्थरबाजी हुई, जिसमें दो लोग घायल हो गए। स्थिति को नियंत्रित करने के लिए पुलिस को हल्का बल प्रयोग करना पड़ा।

### ■ विवाद का कारण और घटनाक्रम

नारपोली के भंडारी चौक पर भाजपा उम्मीदवार यशवंत टावरे और कांग्रेस उम्मीदवार जितेंद्र पाल के चुनावी कार्यालय आमने-सामने हैं। प्रत्यक्षदर्शियों के अनुसार कांग्रेस की एक चुनावी रैली जब इस क्षेत्र से गुजरी, तब नारेबाजी को लेकर दोनों गुटों में शाब्दिक बहस शुरू हो गई। देखते ही देखते विवाद इतना बढ़ गया कि कार्यकर्ताओं ने एक-दूसरे पर प्लास्टिक की कुर्सियां, लाठियां और पत्थरों से हमला कर दिया। भाजपा प्रत्याशी ने आरोप लगाया कि पुलिस की मौजूदगी में कांग्रेस कार्यकर्ताओं ने जानबूझकर उनके कार्यालय के पास आकर पत्थरवाजी की। जबकि कांग्रेस पक्ष ने भाजपा कार्यकर्ताओं पर हमले का आरोप लगाया है।

### ■ कानूनी कार्रवाई और आचार संहिता का उल्लंघन

इस मामले में पुलिस ने कड़ा रुख अपनाते हुए नारपोली और भोईवाडा पुलिस थानों में दोनों पक्षों के कुल 23 नामजद पदाधिकारियों सहित 40 से अधिक अज्ञात लोगों के खिलाफ मामला दर्ज किया है। पुलिस जांच में एक और गंभीर तथ्य सामने आया है कि कांग्रेस उम्मीदवार द्वारा निकाली गई रैली और चुनावी कार्यालय के लिए आवश्यक प्रशासनिक अनुमति नहीं ली गई थी। चुनाव निर्णय अधिकारी के मार्गदर्शन में 'उड़न दस्ते' (Flying Squad) के कर्मचारी संदीप चव्हाण की शिकायत पर जितेंद्र पाल के विरुद्ध 'आचार संहिता उल्लंघन' का मामला भी दर्ज किया गया है।

### ■ सुरक्षा व्यवस्था कड़ी

घटना के तुरंत बाद पुलिस उपायुक्त शशिकांत बोराटे और सहायक पुलिस आयुक्त सचिन सांगले ने भारी पुलिस बल के साथ घटनास्थल का दौरा किया। क्षेत्र में तनावपूर्ण शांति व्याप्त है और सुरक्षा के मद्देनजर अतिरिक्त पुलिस बल तैनात कर दिया गया है। प्रशासन ने सभी उम्मीदवारों को चेतावनी दी है कि आचार संहिता का उल्लंघन और हिंसा करने वालों के खिलाफ कठोर कार्रवाई की जाएगी।

Scanned with OKEN Scanner

दै० लोकमत दि० ०८/०१/२०२६

मस्ट READ

# उमेदवारांच्या सोशल मीडियावर पोलिसांची तीक्ष्ण नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** पालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा जोर आता चांगलाच वाढला आहे. मतदारांच्या घरोघरी जाण्याबरोबरच समाज माध्यमांवरही उमेदवार आणि कार्यकर्त्यांकडून प्रचार केला जात आहे. यातून मतदारांना प्रलोभन दाखविणारे, भावना भडकविणारे तसेच आचारसंहिता भंग होईल, असे कृत्य करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी पोलिसांच्या विशेष पथकाची नेमणूक केली आहे.

प्रत्येक प्रभागातील पोलिस मित्र उमेदवारांच्या आणि पक्षांच्या सोशल ॲक्टिव्हिटीवर बारीक लक्ष ठेवून राहणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांनी दिली.

## सोशल मीडियाचा वापर

ठाणे, कल्याण - डोंबिवली, भिवंडी आणि उल्हासनगर पालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला जोर आला आहे. आरोप - प्रत्यारोपांच्या फैरीही झडू लागल्या आहेत. राजकीय नेत्यांबरोबरच कार्यकर्तेही प्रचारासाठी सज्ज झाले आहेत. त्यामुळे निवडणुकांमध्ये सोशल मीडियाचाही प्रभावी वापर केला जात आहे.


**अनेक उमेदवारांनी विविध समाज माध्यमांवर आपले ग्रुप, पेज तयार केले आहेत. आपले व्ह्युअर्स आणि फॉलोअर्स वाढविण्यावर जोर दिला आहे. त्यामुळेच पोलिसांनीही सोशल मीडियाकडे आपली नजर वळविली आहे.**



**सोशल मीडियावर प्रचारासाठी निवडणूक आयोगाकडून मंजुरी आवश्यक असते.**

## ... तर कारवाई होणार

उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना सोशल मीडियावर प्रचारासाठी निवडणूक आयोगाकडून मंजुरी आवश्यक आहे. उमेदवारांना प्रचारासाठी सोशल मीडियावर टाकण्यात येणाऱ्या ध्वनिफीत व चित्रफितीसाठी निवडणूक आयोगाकडून परवानगी घ्यावी लागणार आहे. समाज माध्यमातून उमेदवारांच्या जाहिराती अथवा इतर मजकूर प्रसिद्ध करताना परवानगी बंधनकारक आहे. परवानगी न घेता प्रचार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.



## विशेष पथकाची निर्मिती

समाज माध्यमांद्वारे गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष पोलिस पथकाची निर्मिती केली आहे. पोलिस उपायुक्तांच्या अधिपत्याखाली दोन सहायक पोलिस आयुक्तांचा या पथकात समावेश राहणार आहे. समाज माध्यमांबाबत येणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगानेही या पथकाकडून कारवाई होणार आहे.

Scanned with OKEN Scanner

पे० मुंबई इन्कलाब दि० 06/09/2024

# بھیونڈی: ای وی ایم کی حفاظت کے لئے مضبوط اسٹرانگ روم تیار کرنے کا دعویٰ

## میونسپل حدود میں کُل ۷؍انتخابی دفاتر میں اسٹرانگ روم بنایا جائیگا جہاں ای وی ایم رکھی جائیں گی اور فریقین کی موجودگی میں اسے سیل کیا جائیگا



فرحان خان ہال میں سیمنٹ کی مضبوط دیواروں والا اسٹرانگ روم تیار کیا جارہا ہے

**بھیونڈی**، (خالد عبدالقیوم انصاری): میونسپل کارپوریشن کے عام انتخابات کے سلسلے میں میونسپل انتظامیہ اور پولیس محکمہ کی جانب سے تمام تر تیاریاں آخری مراحل میں داخل ہو چکی ہیں۔ انتخابی عمل کو شفاف اور محفوظ بنانے کیلئے میونسپل حدود میں کُل ۷؍انتخابی دفاتر قائم کئے گئے ہیں جہاں ای وی ایم کی حفاظت کے لئے خصوصی اور مضبوط اسٹرانگ روم تیار کئے جا رہے ہیں۔ انتخابی شیڈول کے مطابق ۱۵؍جنوری کو ووٹنگ مکمل ہونے کے بعد ای وی ایم کو سخت حفاظتی انتظامات کے تحت ان اسٹرانگ روم میں محفوظ رکھا جائے گا، جبکہ ووٹوں کی گنتی ساتوں علیحدہ علیحدہ انتخابی دفاتر میں انجام دی جائے گی۔


میونسپل کمشنر و چیف الیکشن آفیسر انمول ساگر نے بتایا کہ ریاستی الیکشن کمیشن کی ہدایات کے مطابق ساتوں انتخابی دفاتر میں انتخابی افسران، معاون انتخابی افسران سمیت دیگر ذمہ دار افسران کی تقرری مکمل کر لی گئی ہے۔ ہر انتخابی دفتر میں ای وی ایم کے لئے علیحدہ اور محفوظ اسٹرانگ روم قائم کیا جا رہا ہے۔ انہوں نے مزید بتایا کہ ملت نگر میں واقع فرحان خان ہال، بھادوڑہ کے سمپدا نائک ہال، کامت گھر کے ورالا دیوی ماتا ہال، شاہ محمد ہال اور کومبڑ پاڑا کے راجیا گاجینگی ہال سمیت مجموعی طور پر ۷؍مقامات پر انتخابی دفاتر قائم کئے گئے ہیں جہاں بیلٹ مشینوں کی حفاظت کیلئے خصوصی اسٹرانگ روم تعمیر کئے جا رہے ہیں۔ سیکوریٹی کے نقطۂ نظر سے اسٹرانگ روم کو اینٹ اور سیمنٹ کی مضبوط دیواروں کے ذریعے ۳؍اطراف سے مکمل طور پر بند کیا جارہا ہے جبکہ داخلے کے لئے صرف ایک راستہ رکھا گیا ہے۔ ووٹنگ کے بعد ای وی ایم کے بکسے رکھنے کے بعد اسٹرانگ روم کو تمام متعلقہ فریقین کی موجودگی میں سیل کیا جائے گا اور اس کے اطراف سخت پولیس سیکوریٹی تعینات رہے گی۔

میونسپل کارپوریشن کے عوامی رابطہ افسر شری کانت پردیشی نے بتایا کہ ملت نگر کے فرحان خان ہال کی پہلی منزل پر ای وی ایم کے بکسوں کے لئے سیمنٹ کی دیواروں والا اسٹرانگ روم تیار کرنے کا کام شروع کر دیا گیا ہے اور اسی طرز پر دیگر تمام انتخابی دفاتر میں بھی اسٹرانگ روم کی تیاری جاری ہے۔

Scanned with OKEN Scanner

हिन्दी सा. खबर-दर-खबर दि० 05/1/2026 से दि० 13/01/2026

# अब एक कॉल पर दर्ज होगी शिकायत




## ■ मुख्य चुनाव निरीक्षक तैनात, प्रशासन भी मुस्तैद

■ केडीके न्यूज नेटवर्क

भिवंडी मनपा चुनाव को दोषमुक्त, पारदर्शी और शांतिपूर्ण वातावरण में संपन्न कराने हेतु राज्य चुनाव आयोग ने अपनी कमर कस ली है। इसी कड़ी में भिवंडी महानगरपालिका के आगामी आम चुनाव के लिए नियुक्त किए गए मुख्य चुनाव निरीक्षक और अन्य वरिष्ठ अधिकारियों ने शहर में दस्तक दे दी है।

राज्य चुनाव आयोग द्वारा आदिवासी विकास निगम के अतिरिक्त आयुक्त गोपीचंद कदम को 'मुख्य चुनाव निरीक्षक' तथा दिव्यांग वित्त एवं विकास निगम के प्रबंध निदेशक प्रकाश थविल को 'चुनाव निरीक्षक' के रूप में नियुक्त किया गया है। पिछले दिनों 31 दिसंबर बुधवार को भिवंडी पहुंचने पर मनपा आयुक्त एवं मुख्य चुनाव निर्णय अधिकारी अनमोल सागर ने उनका स्वागत किया। पदभार संभालते ही दोनों निरीक्षकों ने शहर के विभिन्न चुनाव कार्यालयों संपदा नाईक सभागृह (भादवड), वरालदेवी मंगल भवन, अलहाज शाह मोहम्मद बहुउद्देशीय हॉल और स्व. राजय्या गाजेंगी सांस्कृतिक हॉल का सघन दौरा किया। इस दौरान उन्होंने चुनाव तैयारियों की समीक्षा की और ईवीएम (EVM) मशीनों की जांच प्रक्रिया का भी बारीकी से निरीक्षण किया।

## टोल फ्री हेल्पलाइन

आचार संहिता के उल्लंघन को रोकने और त्वरित समाधान के लिए एक टोल फ्री हेल्पलाइन भी शुरू की गई है।

टोल-फ्री नंबर: 18002331105

ई-मेल: bncmc.ele.mcc@gmail.com

आधिकारिक वेबसाइट: (https://election.bncmc.gov.in/contact)

## शिकायतों के लिए 'कंट्रोल रूम' और 'टोल-फ्री' नंबर जारी

प्रशासन ने चुनाव संबंधी शिकायतों के निवारण हेतु पुख्ता इंतजाम किए हैं। मनपा मुख्यालय की दूसरी मंजिल पर स्थित कक्ष क्रमांक 214 में निरीक्षकों का कार्यालय स्थापित किया गया है। जहां नागरिक व्यक्तिगत रूप से अपनी शिकायतें दर्ज करा सकते हैं। मनपा अनमोल सागर ने नागरिकों से अपील की है कि वे किसी भी प्रकार की चुनावी अनियमितता या आचार संहिता के उल्लंघन की जानकारी तत्काल इन माध्यमों से साझा करें। प्रशासन ने स्पष्ट किया है कि चुनाव प्रक्रिया की शुचिता बनाए रखने के लिए हर स्तर पर कड़ी निगरानी रखी जा रही है।

Scanned with OKEN Scanner

दै० महाराष्ट्र टाइम्स
दि० ०५/०१/२०२६

# भिवंडीतून पिस्तूल, काडतूस जप्त

म. टा. प्रतिनिधी, ठाणे



महापालिका निवडणुकीच्या धुमाळीत गुन्हे शाखेच्या भिवंडी युनिटने भिवंडीतील शास्त्रीनगर परिसरातून एका व्यक्तीला अटक करत त्याच्याकडून एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतुस जप्त केले. या प्रकरणी भिवंडी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शास्त्रीनगर येथील खदान रोड परिसरात बसलेल्या एक व्यक्तीकडे पिस्तूल असल्याची माहिती पोलिस शिपाई अमोल इंगळे यांना मिळाली होती. या माहितीनंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मिथुन भोईर, पीएसआय रविंद्र पाटील यांच्या पथकाने सापळा लावत अक्षय वर्मा ऊर्फ शिवा (२९) याला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याकडे एक पिस्तूल आणि एक काडतूस मिळाले. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी अक्षय याला अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखा चौकशी करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner

दै० महाराष्ट्र जनमुद्रा दि० ०७/०१/२०२६

# बोगस मतदानासाठी, प्रचारासाठी मनुष्यबळ पुरवणारी दलाल टोळी भिवंडीत सक्रिय..????

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेची आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांच्या बैठका व मतदारांशी जनसंपर्क संवाद सुरु झाला आहे. तर दुसऱ्या बाजूला या निवडणुकीच्या निमित्ताने निघणाऱ्या प्रचार रॅली,सभा व मतदानासाठी बोगस मतदारांची टोळी तयार करण्याचे काम काही दलालवर्ग करीत असून पोलिसांनी व महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.तसेच निघणाऱ्या प्रचार रॅलीचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे अशी मागणी होत आहे. भिवंडी महापालिकेची येत्या १५ जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्ष व अपक्ष, आघाडीच्या उमेदवारांनी गल्लोगल्लीत जाऊन प्रचार सुरू केला आहे.

शिवसेना, भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह विविध राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांनी मतदारांशी संपर्क साधून कामकाज सुरू केले आहे.प्रचार रॅली, सभा,स्लीपा वाटप अशा विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत असल्याने काही राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवार हे या कामकाजासाठी भाडेतत्वावर अथवा रोजंदारीवर बेरोजगार युवकांसह महिला व पुरुष वर्ग शोधत आहेत. त्यां मुळे अशा उमेदवारांना महिलांसह पुरुषवर्ग पुरविण्यासाठी शहरात गेल्या काही दिवसांपासून दलालांच्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत. हे दलाल बोगस मतदानासाठी देखील १ हजार,दोन हजार ते पाच हजार पर्यंत बोगस मतदार उपलब्ध करून देत असल्याची चर्चा सुरु झाली आहे. शहरातील झोपडपट्टी भागातील महिला-पुरुष पैशाच्या आमिषाने अशी कामे करण्यासाठी पुढे येत असल्याने त्यांचा गैरफायदा घेतला जात आहे. प्रचारा दरम्यान या लोकांना आपण कोणत्या पक्षाचा अथवा उमेदवाराचा प्रचार करीत आहे,हे देखील सांगता येत नाही. तसेच अशा काही महिलांची व पुरुषांचे बोगस मतदानासाठी बनावट आधार कार्ड,ओळखपत्रे तयार केली जात असून मागील महानगरपालिका निवडणुकीत भोईवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कचऱ्यात बोगस मतदारांची ओळखपत्रे मिळाली होती. त्यामुळे पोलीस विभागासह निवडणूक विभागाला देखील सतर्क राहणे क्रमप्राप्त बनले आहे. नुकतेच अंबरनाथ येथे निवडणुकीत मतदान करण्यासाठी भिवंडीतून १५०-२०० बोगस मतदारांना काही दलालानी पुरविल्याचे पोलिसांनी उघडकीस आणले आहे. या बाबत गुन्हा दाखल झाला आहे.सदरचे बोगस मतदार भिवंडी शहरातील शांतीनगर भागातील रहिवासी असल्याची पोलिसांनी सांगितले. पान ३ वर

## बोगस मतदानासाठी, प्रचारासाठी मनुष्यबळ पुरवणारी दलाल टोळी सक्रिय

या बाबत सखोल चौकशी सुरु झाली आहे. भिवंडीत निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने बोगस मतदारांना मतदानासाठी तसेच प्रचार रॅली व इतर कामासाठी इच्छुक उमेदवारांना पुरविण्यासाठी शहरातील दलाल वर्ग सक्रिय झाला असून या टोळ्या शहरातील विविध भागात सक्रिय झाल्या आहेत.भिवंडीत निवडणूक निमित्ताने होणारे बोगस मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयुक्त अनमोल सागर व पोलीस उप आयुक्त शशीकांत बोराटे यांनी या सक्रीय टोळ्यांचा शोध घेऊन बंदोबस्त करावा.तसेच प्रचार रॅलीत सहभागी होणाऱ्या पुरूष-महिलांची नांवे व पत्ते यांची नोंद घ्यावी.व्हिडिओ चित्रिकरण करावे त्यामुळे निवडणूकीतील गैरप्रकारांना आळा बसेल.तसेच परिसरात अशांतता निर्माण होणार नाही. तसेच इतर वार्ड अथवा प्रभागातील नागरिकांच्या सहभागास अटकाव करून त्यांची व्हिडिओ शुटिंग करावी आणि निवडणूक नियमानुसार उमेदवारावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शहरातील सामाजिक संस्था आणि दक्ष नागरिकांकडून केली जात आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० सागर दि० ०७/०१/२०२६

# महापालिका अधिकारी-कर्मचारी यांना प्रचारात सहभागी होण्यास मनाई

**भिवंडी :** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ येत्या १५ जानेवारी रोजी होत आहे. त्या निमित्ताने शिवसेना, काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, समाजवादी पक्षासह विविध अपक्ष उमेदवारांचे आघाडया प्रचार करीत असुन ठिकठिकाणी प्रतिस्पर्धी उमेदवारांमध्ये हाणामारी व शिवीगाळ होण्याचे प्रमाण घडत आहेत. त्यामुळे पोलीस व निवडणूक प्रचार यंत्रणा सतर्क झाली असून सर्व घटनांचे व्हिडीओ चित्रिकरण केले जात आहे.

निवडणूक निमित्ताने भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता सुरु आहे. आचारसंहिता कालावधीत महानगरपालिकेचे प्रभारी अधिकारी-कर्मचारी यांनी कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यक्रम, रॅली, सभा सहभागी होऊ प्रचार करू नये,या बाबत महापालिकेच्यावतीने लेखी पत्राद्वारे मनाई सूचना देण्यात आल्या आहेत. तरी देखील महापालिकेतील काही कर्मचारी लपून छपून आपल्या ''आका''ला मदत करताना दिसत आहेत.त्यामुळे आचारसंहिता पथकाचे प्रमुख तथा भिवंडी मनपाचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी याबाबत लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकी ची घोषणा झाल्यानंतर संपूर्ण मनपा क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे. आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे,या करिता आचारसंहिता पथकामध्ये पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश आहे.त्यापैकी काही कर्मचारी जाणीवपूर्वक काही वार्डात गस्त करीत नाही.अशी माहिती स्थानिक नागरिक देत आहेत.मागील २०१७ च्या महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवाराच्या प्रचारात सहभागी झाल्या बद्दल पालिकेच्या सहा कर्मचाऱ्यांवर आचारसंहिता पथक व आयुक्तांनी त्यांना नोटीस देऊन कारवाई केली होती. त्यावेळी उमेदवारांच्या प्रचारामध्ये पालिकेचे कर्मचारी आढळून आले होते असा त्यांच्या वर आरोप ठेवण्यात आला होता. निवडणूक कालावधीत आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे या साठी संपूर्ण मनपा क्षेत्रात भरारी पथके तसेच व्हिडीओ सर्वेलिअंस पथक (तड्ढ) पथके तैनात करणेत आलेली आहेत. सदर पथकांमार्फत संपूर्ण मनपा क्षेत्रातील राजकीय हालचालींचे छायाचित्रीकरण करण्यात येत आहे. या दरम्यान मनपाच्या आस्थापनेवर व कंत्राटी स्वरुपात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात राजकीय पक्षांचे कार्यक्रम, प्रचार, रॅली, सभांमध्ये सहभागी होऊ नये. सोशल मिडीयावर राजकीय स्टेटस, पोस्ट, रिल्स शेअर करण्यात येवू नयेत. या बाबतची तक्रार प्राप्त झाल्यास किंवा असे निदर्शनास आल्यास आदर्श आचासंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधितांवर कायदेशीर तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे सर्व कर्मचाऱ्यांना अवगत करण्यात आले आहे, अशी माहिती आचार संहिता प्रमुख तथा पालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner